संशोधन आराखडा

“परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नानाजी देशमुख कृषि संजीवनी योजनेचे योगदान : एक अभ्यास (2017-18 ते 2024-25)”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत अर्थशास्त्र विषयातील

पीएच् . डी. पदवीसाठी सादर करावयाचा शोध आराखडा

संशोधक

तुकाराम धर्माजी हारणे

मार्गदर्शक

प्रा. डॉ. रत्नाकर रामराव कांबळे

अर्थशास्त्र विभाग

शारदा महाविद्यालय, परभणी .

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

अनुक्रमणिका

अ. क्र.	घटक	पान क्र.
१	प्रस्तावना	3
२	विषयाची निवड	5
३	संशोधनाचे महत्व	5
४	उद्दिष्टे	6
५	ग्रहीतके	6
६	संशोधन पद्धती	7
७	संशोधनाची व्याप्ती	7
८	संशोधन अभ्यासाच्या मर्यादा	8
९	प्रकरणाच्या रूपरेषा	8
१०	संदर्भसूची	10

परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे योगदान:एक अभ्यास(2017-18 ते 2024-25)

१. प्रस्तावना :-

भारत देशाला फार पूर्वीच्या काळापासून कृषीक्षेत्राचा इतिहास लाभलेला आपल्याला दिसून येतो. अगदी सिंधु संस्कृतीच्या काळात शेती क्षेत्राला महत्त्व दिलेले दिसते तसेच कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही मौर्य राज्याच्या काळात कृषी व कृषी क्षेत्रांना चालना देण्यासाठी कृषी अधिकारी नेमले गेल्याचे दिसून येते. शेती क्षेत्राला हज़ारो वर्षापूर्वीचा इतिहास हा लाभलेला आहे. ऋग्वेदातही शेतीचे महत्त्व सांगताना असे म्हटले जाते की, जुगार खेळू नका शेती करा आणि सन्मानाने पैसे मिळवा भारतात स्वतंत्रपूर्वी काळात शेती क्षेत्राची अवस्थाही अत्यंत बिकट झालेली दिसते कारण भारताची अर्थव्यवस्था ही ब्रिटिशांच्या ताब्यात होती.परंतु भारत स्वतंत्र झाल्यानंतर 1965-66 रोजी हरित क्रांती झाली तेव्हा कृषिक्षेत्रातील उत्पन्न हे वाढले.1965-66 च्या हरित क्रांतीमुळे विविध प्रकारच्या हायब्रीड बियाण्यांचा कीटकनाशकांची निर्मिती करण्यात आली व त्यातून कृषिक्षेत्राचे उत्पन्न वाढण्यास चालना मिळालीकरण्यात आली व त्यातून कृषिक्षेत्राचे उत्पन्न वाढण्यास चालना मिळाली. तसे पाहिले असता भारतातील लोकसंख्येच्या 58 टक्के लोकांचे जीवन कृषी क्षेत्रावर आधारलेले आहे. कारण भारतातील सर्वात मोठा व्यवसाय म्हणजे होय. कारण जगातील 2/3 लोक हे शेती व शेती व्यवसायाशी निगडित आहेत. 18 व्या शतकामध्ये औद्योगिक क्रांती झाली त्यामुळे कृषी क्षेत्राच्या उत्पादनाला मोठी मागणी प्राप्त झाली. कृषी क्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेत मोठे योगदान आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर भारतातील 70 टक्के लोकसंख्या ही कृषी क्षेत्रावर अवलंबून होती. कारण की मानवाच्या मूलभूत गरजा आहेत अन्न वस्त्र निवारा या तिन्ही गरजांची पूर्तताही शेती क्षेत्रातून केल्या जाते. तसेच मोठ मोठे उद्योग यांना कच्चा मालाचा पुरवठा हा कृषी क्षेत्रातून होतो कृषी क्षेत्रातून रोजगार निर्मितीही मोठ्या प्रमाणात होत असते परंतु अलीकडच्या काळात वातावरणात वारंवार होत असलेले बदल हे शेती क्षेत्राच्या उत्पादनात घट निर्माण करतात. कारण की बहुतांश शेतीक्षेत्र हे निसर्गावर अवलंबून आहे, आज सुद्धा 56 टक्के शेती ही पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असलेली दिसून येते. आणि महाराष्ट्रातील शेती फक्त 16.4 टक्के सिंचनाखाली आहे. त्यामुळे उत्पादनात घट होते. कृषी उत्पादनात घट होण्यामागचे कारण बदलते वातावरण वाढतं रासायनिक खतांचा वापर व चुकीच्या सिंचनाच्या पद्धतीमुळे उत्पादनात घट होऊन जमिनीची सुपीकताही कमी होत चालली आहे कृषी क्षेत्राची उत्पादकता वाढवण्यासाठी सरकार विविध योजनांचे अमलबाजवणीही करत असते.

वातावरणातील बदल हां एक जगातील सर्वात मोठा प्रश्न आहे. कारण दिवसेंदिवस वातावरणात बदल हे मोठ्या प्रमाणात होत असताना दिसून येते याच वातावरण बदलाचा परिणाम हा शेती क्षेत्रावर होतो,याचा परिणाम हा कमी करण्यासाठी तसेच शेतीच्या उत्पादनात घट न होऊ देण्यासाठी भारत सरकारने जागतिक बँकेच्या अर्थसाह्याने व महाराष्ट्र शासनाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना राबवली आहे.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेची निर्मिती 2017 मध्ये करण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून शेती क्षेत्राला चालना देण्यासाठी विविध उपक्रमांचा समावेश करण्यात आला. या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे शेतीक्षेत्रामध्ये आधुनिक पद्धतीनुसार विकास घडवून आणणे व नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेती क्षेत्रामध्ये विकास घडवून आणणे तसेच आधुनिक शेती प्रगती करणे.कारण की भारतात अजूनही शेती करण्याच्या पद्धती पारंपारिक पद्धतीने आहे परंतु या पारंपारिक पद्धतीमुळे शेतीक्षेत्राचे उत्पन्न वाढलेले दिसून येत नाही.

भारतीय समाजसेवक चंडिकादास अमृतराव देशमुख यांचे नाव हे या योजनेला देण्यात आले ते एक भारतीय जनसंघाचे नेते होते त्यांचा जन्म 11 ऑक्टोबर 1916 रोजी झाला होता. व त्यांनी राजकारणात प्रवेश केला तेव्हा 1977 रोजी जनता पक्षाचे सरकार स्थापन झाले होते तेव्हा मोरारजी देसाई यांचा मंत्रिमंडळात प्रवेश करण्यात आला होता. वर त्याने असे सांगितले की 60 वर्षावरील मंत्र्याने मंत्रिमंडळात न राहता बाहेर राहून समाजसेवा करावी असे सांगितल्यानंतर त्यांनी मंत्रिपद सोडून दिले आणि आयुष्यभर दीनदयाल या संस्थेच्या प्रकल्प विस्तारासाठी कार्यरत राहिले. पुढे माननीय अटलजींच्या काळात यानी आरोग्य व ग्रामीण भागातील स्वावलंबन या क्षेत्रात अनुकरणीय कामगिरी केली. या कामगिरीबद्दल त्यांना पद्मविभूषण या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. व 2019 मध्ये त्यांना भारत रत्न या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेला pocra असेही म्हणतात pocra म्हणजे Project on climate resilient agricultureअसा होतो. महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्थाही कृषी क्षेत्रावर आधारलेली दिसून येते काही काळापूर्वी महाराष्ट्र राज्य शेतीक्षेत्रामध्ये अत्यंत खालचे राज्य होते, परंतु वसंतराव नाईक यानी राबवलेल्या कृषी धोरणामुळे महाराष्ट्र राज्य आघाडीचे राज्य म्हणून ओळख निर्माण झाली. म्हणूनच वसंतराव नाईक यांना महाराष्ट्र राज्याचे हरित क्रांतीचे जनक म्हणून ओळखतात. नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमुळे शेतकऱ्यांना विविध योजनांच्या माध्यमातून व प्रकल्पांच्या माध्यमातून आत्मनिर्भर व उद्यमशील बनवणे तसेच गावाचा विकास लोकशिक्षण, गो संवर्धन, पारंपरिक कृषीपद्धतीचा विकास, नवीन कृषी सिंचनाची माहिती करून देणे व विविध समाजपयोगी कामात योगदान देने होय.या योजनेच्या माध्यमातून विविध प्रकारचे वृक्ष लागवड करणे, फळबाग, फुलबाग, यंत्र, अवजारे, तसेच विविध प्रकारचे बियाणे, सिंचनाच्या पद्धती, विहीरी, मागेल त्याला शेततळे,सेड नेट, पॉलिहाउस इत्यादी योजनांची अंमलबजावणीही या योजनेद्वारे करण्यात येते. बदलत्या वातावरणात शेतकर्यांच्या उत्पन्नात घट होऊ नये यासाठी या योजनेजी निर्मितही करण्यात आली आहे तसेच जमिनीची सुपीकता वाढवावी व सेंद्रिय खताची निर्मिती व्हावी यासाठीही अनुदान दिले जाते.

२. विषयाची निवड :-

परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे योगदान:एक अभ्यास(2017-18 ते 2024-25) या विषयाची निवड ही वातावरणात होणारे नेहमी बदलामुळे शेती क्षेत्रातील उत्पन्न हे दिवसेंदिवस कमी होत चालले आहे त्यामुळे उत्पन्नात घट होऊ नये यासाठी या योजनेची निर्मिती करण्यात आली.महाराष्ट्रातील मराठवाडा या विभागात परभणी हा जिल्हा येतो. परभणी जिल्ह्यातील बहुतांश क्षेत्र हे कृषि क्षेत्राखाली येते व तेथील लोक हे शेतीव्यवसाय करतात परभणी जिल्ह्यात एकूण लोकसंख्या 18,35,982 (2011 चा जनगणनेनुसार) एवढी आहे. परभणी जिल्ह्यात नऊ तालुके आहेत. तेथील बहुतांश कृषी क्षेत्रावर आधारलेले आहे परंतु वातावरणातील बदलामुळे शेतीवर परिणाम होतात व उत्पन्न कमी होते.

परभणी जिल्ह्यात कृषीक्षेत्रात बदल घडवून आणण्यासाठी नवीन तंत्रज्ञान विकसित करणे परभणी जिल्ह्यात अजूनही पारंपरिक पद्धतीने शेती केले जाते या पारंपारिक पद्धतीला बदलुन आधुनिक पद्धतीने शेती विकसित व्हावी. तसेच परभणी जिल्हा महाराष्ट्रातील सर्वात मागासलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो परभणी जिल्हा हा मराठवाडा विभागातील असून सुद्धा या जिल्ह्याचा विकास झालेला दिसून येत नाही.परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासात वाढवावी या उद्देशाने या विषयाची निवड करण्यात आली आहे.

३. संशोधनाचे महत्त्व:-

परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे योगदान:एक अभ्यास (2017-18 ते 2024-25)याविषयाचे महत्त्व म्हणजे भारतातील बहुसंख्य जनता ही कृषी क्षेत्रावर आधारलेले व भारताचा प्रमुख व्यवसाय म्हणूनही शेती क्षेत्राकडे पाहिले जाते.

परभणी जिल्ह्यातील बहुतांश क्षेत्र कृषी क्षेत्रावर आधारलेले आहे व तेथील व्यवसायसुद्धा कृषी क्षेत्रावरच अवलंबून आहेत तरी सुद्धा परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकास हा झालेला दिसून येत नाही. आज ही परभणी जिल्हा सर्वात मागासलेला जिल्हा म्हणून ओळखले जाते परभणीतील दरडोई उत्पन्न हे फारच कमी आहे. कारण की परभणी जिल्ह्यात शेती करण्याचाही पद्धती या अजूनही पारंपारिक आहे जसे की विविध सिंचनाच्या पद्धती तसेच पाण्याचा गैरवापर, रासायनिक खत इत्यादि. मुळे शेतीची सुपीकताही कमी होत चालली आहे त्यामुळे शेतीला पूरक व्यवसाय निर्मिती करणे व शेती क्षेत्र विकसित करणे.

४. उद्दीष्टे :-

1) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचा अभ्यास करणे.

2) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितित झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

3) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमुळे शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

4) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत उपक्रमांचा अभ्यास करणे.

5) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमुळे परभणी जिल्ह्यातील कृषी व पूरक व्यवसाय यांचा अभ्यास करणे.

6) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत उद्भवणार् या समस्या अभ्यास करणे.

५. गृहीतके :-

1) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमुळे शेतकऱ्यांना लाभ होत आहे

2) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमुळे शेतकऱ्यांच्या राहणीमानात सुधारणा होत आहे.

3) नानाजी देशमुख कृषी संजीवनी या योजनेमुळे आर्थिक व सामाजिक बदल होत आहेत.

4) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना जिल्ह्यात प्रभावीपणे राबवण्यात येत आहे.

5) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमुळे कृषी व पूरक व्यवसायांना चालना मिळत आहे.

6) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेची अमलबजावणी करत असताना मोठ्याप्रमाणात अडचणी निर्माण होत आहेत.

६. संशोधन पद्धती:-

प्रस्तुत विषयी परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे योगदान:एक अभ्यास(2017-18ते2024-25) याविषयाच्या संशोधनासाठी संशोधन पद्धती प्राथमिक व द्वितीय प्रकारची वापरण्यात येणार आहे जात स्वतः जाऊन तेथील शेतकऱ्यांच्या मुलाखती प्रश्नावली अनुसूची इत्यादींच्या मार्फत व विविध ग्रंथ साहित्य विविध प्रकारचे लेख, मासिके, वर्तमानपत्र इत्यादींच्या माध्यमातून माहिती संकलित करणार आहोत.

- **प्राथमिक पद्धती:-**

परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे योगदान:एक अभ्यास(2017-18ते2024-25) या विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक पद्धतीही वापरण्यात येणार आहे.ज्या मध्ये प्रत्यक्ष जाउन शेतकऱ्यांच्या भेटी, थेट मुलाखती, प्रश्नावली, अनुसूची, इत्यादींच्या मार्फत माहिती संकलित करण्यात येणार आहे.

- **द्वितीय पद्धती:-**

परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे योगदान:एक अभ्यास(2017-18ते2024-25) या विषयाच्या संशोधना साठी द्वितीय सामग्रीमध्ये आपण विविध ग्रंथ, विविध लेखकांची पुस्तके, साहित्य, वर्तमानपत्रातील लेख, सरकारी अहवाल, मासिके, शोधनिबंध, प्रबंधन, विविध प्रकाशित साहित्य इत्यादींच्या आधारे माहिती संकलित करणार आहोत.

- **नमुना निवड:-**

विश्व किंवा सामग्रातील फक्त काही प्रतिनिधिक एककांची निवड करणे म्हणजे नमुना निवड होय. परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे योगदान:एक अभ्यास(2017-18ते2024-25) या विषयाच्या नमुना निवड करण्यासाठी आपण प्राथमिक व द्वितीय पद्धतीची नमुना निवड केल आहे. तसेच या अभ्यासविषयाच्या संशोधनासाठी नमुना निवड करण्यासाठी नमुना निवड ही सहेतुक नमुना पद्धतीने करण्यात येणार आहे. म्हणजे परभणी जिल्ह्यात एकूण नऊ तालुके आहेतया नऊ तालुक्यातून प्रत्येक तालुक्यातून 10 गावांची(10×9=90) निवडही आपण करणार आहोत.व प्रत्येक गावातून 5 शेतकर्यांची निवड ही करणार आहोत म्हणजेच(90×5=450) एवढी नमुना निवड करणार आहोत.

७. संशोधनाची व्याप्ती:-

परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे योगदान:एक अभ्यास (2017-18 ते 2024-25) या विषयाची निवड ही परभणी जिल्ह्याच्या कृषी क्षेत्रावर आधारित व्यवसाय व त्यातील उद्योगधंदे तसेच शेतीला पूरक असणारे व्यवसाय यांचा अभ्यास करण्यासाठी परभणी जिल्ह्याचे क्षेत्र निवडले आहे. त्यामुळे हा विषय परभणी जिल्ह्याच्या क्षेत्रापुरता मर्यादित आहे.

८. संशोधन अभ्यासाच्या मर्यादा व कालखंड:-

परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे योगदान:एकअभ्यास(2017-18ते2024-25)या विषयाच्या अनुषंगाने,प्रश्नावली,मुलाखत,सरकारी अहवाल हे संपूर्णतः खरोखरच असतील असे नाही व ते सीमित व निर्धारित घटकांच्या आधारावर असता पण त्यामध्ये कार्यक्षेत्र,कालमर्यादा व निष्कर्ष हे तंतोतंत लागू पडतील असे नाही म्हणून विषयावर काही मर्यादा येतात.

९. प्रकरणाची रूपरेषा :-

1) प्रस्तावना:-

यापकरणात कृषी क्षेत्राविषयीची संपूर्ण माहिती इतिहास व कृषी क्षेत्राची महत्व भारतामध्ये किती महत्वाची आहे.तसेच परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे किती योगदान आहे व त्या योजनेची संपूर्ण माहिती यापकरणात करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत कोणकोणत्या अनेक उपक्रम आहे व त्यांना कितीप्रमाणात अनुदान देण्यात येत आहे याची माहिती घेणार आहोत.

2) संशोधन पद्धती व संशोधन साहित्याचा आढावा:-

यापकरणात परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासामध्ये नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे योगदान किती प्रमाणात आहे तसेच मराठवाड्यात किती जिल्ह्यात ही योजना लागू आहे यासाठी आपण अभ्यास करणार आहोत. तसेच या योजनाचा अभ्यास करण्यासाठी विविध ग्रंथ पुस्तके, वर्तमानपत्रातील लेख, संशोधकांनी केलेले लेख, प्रबंधन, निबंध इत्यादींच्या आधारे आपण माहितीही जमा करणार आहोत.

3) परभणी जिल्हा एक दृष्टिक्षेप:-

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण परभणी जिल्ह्याविषयी संपूर्ण माहिती घेणार आहोत. ज्या मध्ये संपूर्ण जिल्ह्याचा इतिहास तसेच परभणी जिल्ह्यातील उद्योग व्यवसाय, परभणी जिल्ह्याची वाहतूक व्यवस्था,परभणी जिल्ह्याच्या कृषीक्षेत्र इत्यादिंचा आढावा या प्रकरणातून घेणार आहोत. परभणी जिल्ह्यात एकूण किती तालुके तसे त्या तालुक्यात किती गावे आहेत व त्या गावांचा विकास हां किती प्रमाणात झालेला आहे तसेच या गावात सोईसुविधा किती प्रमाणात उपलब्ध आहे. त्या गावांची कृषी क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेणार् आहोत. पूर्वीची परभणी जिल्ह्याची कृषी क्षेत्रातील प्रगती च्या आधुनिक पद्धतीनुसार कृषी क्षेत्रातील प्रगती याचासुद्धा आढावा घेणार आहोत. परभणी जिल्ह्यातील सिंचनाच्या सोयी शेती करण्याच्या पद्धती बँकिंग सुविधा इत्यादिविषयी माहिती जमा करणार आहोत.

4) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत येणारे प्रकल्प:-

नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या अंतर्गत येणारे मुख्यतः फळबाग लागवड, फुलबाग,वृक्षारोपण, मातीचे परीक्षण, शेडनेट,पॉलिहाउस,मधमाशीपालन, गोड्या पाण्यातील

मत्स्यपालन, गांडूळखत युनिट, बांबू लागवड,शेततळे, विहीरी, ठिबक सिंचन, पंपसंच, पाइप लाइन, रेशीम, नाडेप कंपोस्ट, इतर कृषी आधारित उद्योग. इत्यादी प्रकल्पांचा यात समावेश होतो.

5) नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना व आर्थिक विकास:-

नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेमुळे शेतकर्यांच्या आर्थिक उत्पन्नात कितीप्रमाणात वाढ झाली याचे अध्ययन याप्रकरणात करणार आहोत. किती शेतकर्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे व शेतीक्षेत्रामध्ये किती प्रमाणात विकास घडून आला याचा एक आढावा याप्रकरणात घेणार आहोत. शेतकर् यांचे पूर्वीचे राहणीमान व आताचे राहणीमान यांच्यातील तुलनात्मक अभ्यास करणार आहे.

6) **नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना व सामाजिक विकास:-**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना व सामाजिक विकास या प्रकरणामध्ये समाजातील शेतकर्यांच्या राहाणीमानाचा दर्जा व खालावलेली स्थिति त्यांचा अभ्यास तसेच या योजनेमुळे त्यांच्या राहणीमानात वर शेती क्षेत्राच्या विकासामुळे आर्थिक बदल हे कशा प्रकारे घडून आले याचा अभ्यास करणार आहोत. शेती क्षेत्रामुळे आर्थिक व सामाजिक बदल हे कशाप्रकारे घडून येतात तसेच आरोग्य शिक्षण व राहाणीमान इत्यादी वर झालेल्या सुधारणांचा अभ्यास करणार आहोत. या योजनेच्या माध्यमातून समाजाचा कोणत्या घटकास किती अनुदान दिले जाते याचे अध्ययन केले जाते.या योजनेमुळे पूर्वी शेतकर् यांकडे समाजात पाहण्याचा दृष्टिकोन कसा होता व आता कसा आहे याचा अभ्यास करणार आहोत.

7) निष्कर्ष व शिफारशी:-

प्रस्तुत संशोधन विषयामध्ये परभणी जिल्ह्याच्या आर्थिक विकासात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेचे योगदान हे किती आहे व अभ्यासातून जे निष्कर्ष निघाले त्या निघालेले निष्कर्ष यावरील शिफारशीं याप्रकरणात मांडण्यात येणार आहे.

8) संदर्भसूची:-

- **परिशिष्टे**

१०. संदर्भसूची :-

- **संदर्भग्रंथ:-**

1) धनंजय आकात,भारतीय अर्थव्यवस्था, रिलायबल पब्लिकेशन.
2) कठारे अनिल,मराठवाड्याचा इतिहास, एज्युकेशन पब्लिकेशन.
3) ऑफिशियल वेबसाइटhttp//dbt.mahapocra.gov.in नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन.
4) परभणी एन. आय.सी.
5) महाराष्ट्र टाइम्स न्यूज पेपर, मार्च 2022, विशेष लेख प्रकाशित.
6) जंगले मंगला, वर्ष 2013, महाराष्ट्राची अर्थव्यवस्था, प्रशांत पब्लिकेशन जळगाव.
7) आगलावे प्रदीप, 2020, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्र,विद्या प्रकाशन, नागपुर
8) शिवनाथ जगन्नाथ गव्हाणे, 2020, परभणी जिल्ह्यातील सिंचनाचे कृषीक्षेत्रावर झालेले परिणाम.
9) नियोजन मंडळ 2005.
10) मिश्र.जे. पी, कृषी अर्थशास्त्र 2008, साहित्य भवन पब्लिकेशन आग्रा.
11) श्यामराव वायसे, महाराष्ट्रातील कृषी क्षेत्राची वाटचाल, गोल्डन रिसर्च थॉट,रिसर्च मासिक,एप्रिल 2014 पेज नंबर .5ते 12.
12) भारतीय अर्थव्यवस्था, निराळी प्रकाशन.
13) नंदकिशोर किसनराव जोजारे,कृषि पर्यटन उद्योग, चेतक बुक्स.
14) वर्तमानपत्रे
15) वेबसाइट्स

    http://yojanaa.marathicrators.com

    http://www.krushikranti.com

संशोधक विद्यार्थी

तुकाराम धर्माजी हारणे

संशोधक मार्गदर्शक

प्रा. डॉ. रत्नाकर रामराव कांबळे